Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 5.69 ISSN No. 2456-1665

# भारताच्या परराष्ट्र धोरणाचे बदलते स्वरूप

**डॉ. अनंत मदन आवटी**
सहयोगी प्राध्यापक,
राज्यशास्त्र विभागप्रमुख,
श्री व्यंकटेश महाविद्यालय,
देऊळगाव राजा जि. बुलडाना.

**सचिन रामलाल जयस्वाल**
संशोधक

**प्रस्तावना –**

कोणत्याही राष्ट्राच्या सार्वभौमत्वासाठी, त्या राष्ट्राचे स्वतंत्र राजकीय धोरण, स्वतंत्र आर्थिक धोरण आणि स्वतंत्र परराष्ट्र धोरण असणे गरजेचे असते. राज्यकर्त्यांच्या राजकीय दृष्टीकोणानुसार आर्थिक धोरणाची घडी बसवण्यात येते तर राजकीय दृष्टीकोण आणि आर्थिक निकड यांची सांगड घालून परराष्ट्र धोरण तयार करण्यात येते. म्हणजे राष्ट्राच्या राजकीय उद्दिष्टांचे रक्षण करण्याची आणि आर्थिक आवश्यक्तांची पूर्ती करण्याची जबाबदारी परराष्ट्र धोरणाच्या माध्यमातून पार पडली जाते.

परराष्ट्र धोरणाची निर्मिती ही सर्वोच्च शासनकर्त्या मार्फत होत असते. आधुनिक काळात लोकशाही व्यवस्थेत परराष्ट्र धोरणाची निर्मिती राज्याच्या शासन कर्त्यांकडून होत असली तरी त्यावर वास्तविकपणे मंत्रिमंडळाचा प्रभाव पडत असतो. मंत्रिमंडळाची संमती म्हणजे अप्रत्यक्षपणे जनतेची संमती असते. त्याचप्रमाणे परराष्ट्र धोरण ठरवत असताना राष्ट्राच्या भौगोलिक, आर्थिक, राजकीय, सामाजिक इ. घटकांचा सुद्धा विचार करावा लागतो. हे निर्धारित घटक परराष्ट्र धोरणाची मर्यादा स्पष्ट करतात. भारताच्या परराष्ट्र धोरणाचा अभ्यास करताना राजकीय नेतृत्वाप्रमाणेच जे निर्धारक घटक आहेत त्यांचा सुद्धा विचार महत्वाचा असतो. भारताच्या परराष्ट्र धोरणाचे शिल्पकार पंडित जवाहरलाल नेहरू हे आहेत. परराष्ट्र धोरणाच्या निर्मितीत आणि जडण घडणीत पंडित जवाहरलाल नेहरू यांचे स्थान अनन्य साधारण आहे. भारतीय संस्कृतीचा वारसा आणि चिरंतन मूल्ये तसेच आधुनिक काळातील राष्ट्रीय गरजा यांचा समन्वय पंडित जवाहरलाल नेहरू यांनी भारताच्या परराष्ट्र धोरणात केल्याचे दिसून येते. वर्तमान काळात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी भारताच्या राष्ट्रीय आकांक्षा आंतरराष्ट्रीय परिस्थितीच्या चौकटीत बसवून त्या आधारे परराष्ट्र धोरणाची अंमलबजावणी करत असल्याचे दिसून येते.

## शोध निबंधाची उद्दिष्ट्ये –

1. भारताच्या  परराष्ट्र धोरणाची मूलभूत तत्वे समजून घेणे.
2. परराष्ट्र धोरणाची राष्ट्राच्या विकासाठी असलेली आवश्यकता समजून घेणे.
3. भारताच्या परराष्ट्र धोरणात परिस्थिति नुसार झालेल्या बदलांचा अभ्यास करणे.
4. भारताच्या परराष्ट्र धोरणातील नवीन विचार प्रवाह समजून घेणे.

## संशोधन पद्धत –

भारताच्या परराष्ट्र धोरणाचे बदलते स्वरूप हा शोध निबंध लिहिण्यासाठी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा वापर केला आहे. प्राथमिक साधने म्हणून भारताचे परराष्ट्र धोरण, संसदीय अधिवेशना मधील चर्चा यांचा वापर केला आहे, तर द्वितीय साधने परराष्ट्र धोरणावरील विविध संदर्भ ग्रंथ, मासिके आणि नियतकालिका मधील लेखांचा वापर केला आहे.

## परराष्ट्र धोरणाचे महत्व –

जागतिकीकरणाच्या काळात आज प्रत्येक राष्ट्र परस्परावलंबी बनले आहे. सामाजिक प्रसार माध्यमे आणि इंटरनेट च्या काळात आज मानव आभासी पद्धतीने एकमेकांच्या खूपच निकट आलेले आहेत. राष्ट्रांच्या बाबतीत सुद्धा ही बाब लागू होते. आज प्रत्येक राष्ट्र आपल्या राष्ट्रीय हितासाठी सजग असते. परराष्ट्र धोरणात राष्ट्रीय हित व आदर्शवाद यापैकी आदर्शवादाला प्राधान्य न देता, राष्ट्रीय हिताला सर्वोच्च प्राथमिकता देण्यात यावी असा आग्रह धरण्यात येतो. राष्ट्रीय हित, ऐतिहासिक वारसा, राज्यकर्त्यांची विचारधारा, राष्ट्राशक्ती आणि आंतरराष्ट्रीय राजकारणाची रचना हे पाच घटक देशाचे परराष्ट्र धोरण निश्चित करताना महत्वाची भूमिका बजावतात. सन 1947 ते सन 1991 आणि सन 1991 ते आजपर्यंत असे परराष्ट्र धोरणाचे दोन कालखंड करता येतील.

सन 1991 मध्ये आंतरराष्ट्रीय राजकारणाची रचना बदलली. सोव्हियत संघ कोलमडल्या मुळे द्विध्रुवीय राजकारणाची जागा एक ध्रुवीय जगाने घेतली. अमेरिका हे एक जागतिक एकमात्र महासत्ता म्हणून समोर आले. स्वातंत्र्य पूर्वकाळातील ऐतिहासिक घडामोडींचे संदर्भ पुढे आमुलाग्र बदलत गेले. विशेषत: आशिया आणि आफ्रिका खंडातील राष्ट्रांना स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतर आणि दक्षिण आफ्रिकेतील वर्ण द्वेषी राजवट संपुष्टात आल्यानंतर वसाहतवाद विरोधी धोरणाची आणि त्या अनुषंगाने पाश्चिमात्य देशांच्या साम्राज्यवादी धोरणांना विरोधाची उपयुक्तता काहीशी मावळली होती. स्वतंत्र भारतात औद्योगिक आणि कृषि विकासामुळे , तसेच संरक्षण क्षमतेत वाढ झाल्यामुळे देशाची शक्ती वाढली होती. सन 1947 च्या तुलनेत सन 1991 मधील भारत हा साधन क्षमतेच्या मानाने अग्रेसर होता. सन 1991 मध्ये राज्यकर्त्यांच्या विचारधारेत मोठा बदल घडून आला होता. समाजवादी उद्दिष्टांच्या प्रभावाखाली संमिश्र अर्थव्यवस्थेच्या जागी भांडवली मुक्त अर्थव्यवस्था निर्माण करण्याला वाव देण्याकडे राज्यकर्त्यांचा कल झुकला होता, जो अद्याप ही कायम आहे. विचारधारेतील परिवर्तनामुळे राष्ट्रीय हिताची व्याख्या बऱ्याच अंशी बदलल्याचे दिसून येते. स्वातंत्र्याच्या पहिल्या चार दशकात राष्ट्रीय हिताच्या यादीत देशाच्या अखंडत्वासह गरिबी निर्मूलनाला सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले होते.

सन 1991 नंतर देशाची एकता आणी अखंडता टिकवून ठेवण्याला तेवढेच महत्व देण्यात येत आहे, परंतु गरिबी निर्मूलनाची जागा मात्र आता आर्थिक विकासाने घेतली आहे. आर्थिक विकासाचे फायदे झिरपत जाऊन तळागाळातील गरिबा पर्यन्त पोहोचतील असा आशावाद राज्यकर्त्यांच्या विचारसारणी मध्ये निर्माण झाल्याचे दिसून येते.

**G - 20 बैठक –**

जगातल्या प्रमुख आणि विकसित तसेच विकसनशील देशांचा समूह गट म्हणजे G 20 गट होय. जगाच्या अर्थ व्यवस्थेचे भविष्य ठरविण्यासाठी हा गट बनवलेला आहे. 1999 साली या गटाची स्थापना करण्यात आली होती. जगातली दोन तृतीयांश लोकसंख्या G - 20 राष्ट्रांमध्ये राहते. जगाच्या एकूण जीडीपी च्या एकूण 85 टक्के जीडीपी या देशांमधून येतो. एकूण जागतिक व्यापाराच्या 75% व्यापार या देशातून असतो. यात अमेरिका, आस्ट्रेलिया, इंग्लंड, चीन, फ्रांस, कॅनडा, सौदी अरेबिया, तुर्की, जपान, मेक्सिको, दक्षिण आफ्रिका, इटली, ब्राजील, जर्मनी, रशिया, अर्जेंटीना  या राष्ट्रांचा समावेश होतो. या वेळी या G – 20 गटाच्या बैठकीचे आयोजन भारताच्या नेतृत्वात 8 ते 10 सप्टेंबर 2023 रोजी नवी दिल्ली येथील भारत मंडपम येथे केल्या गेले. यावेळी G 20 राष्ट्राच्या राष्ट्र प्रमुखासह त्या राष्ट्रांचे व्यापारी प्रतींनिधी मंडल या वेळी भारतात आले. भारताची वाढलेली क्षमता, आर्थिक सुधारणा, समृद्ध सांस्कृतिक वारसा व परंपरा, या सर्वांचा लाभ यावेळी करण्यात आला. या मधून भारताची जागतिक पातळीवरील कूटनीती दिसून आली. या बैठकीत भारत – मध्य पूर्व – युरोप या नवीन मार्गाची कल्पना मांडल्या गेली आणि ती सर्व संमतीने स्वीकारल्या गेली. याच वेळी आफ्रिकन युनियन  ला नवीन सदस्यत्व देण्यात आले. या G – 20 गटाच्या बैठकीच्या यशस्वी आयोजनाने भारताची शान जगभरात वाढली.

**रशिया – युक्रेन युद्ध –**

सुमारे 2 वर्षापासून रशिया व युक्रेन या शेजारी राष्ट्रांमध्ये अंतर्गत मतभेद कारणावरून सशस्त्र युद्ध सुरू आहे. अमेरिका प्रणीत नाटो  (NATO) या लष्करी संघटनेत युक्रेन ने सहभागी होण्याची इच्छा दर्शविताच रशियाने यास विरोध केला. आणि संपूर्ण युरोप, अमेरिका व एकूणच जागतिक जनमत युद्धाच्या विरोधात असताना सुद्धा युक्रेनवर सशस्त्र हल्ला केला. संयुक्त राष्ट्र संघटना व अनेक आंतरराष्ट्रीय संघटनांनी या युद्धाचा निषेध केला आहे. व रशियाने युद्ध ताबडतोड न थांबविल्यास रशिया वर तसेच युद्धास समर्थन देणाऱ्या रशियाच्या मित्र राष्ट्रांवर सुद्धा आर्थिक बहिष्कारची धमकी दिली. अशा नाजुक प्रसंगी भारतीय परराष्ट्र धोरणाची मोठी कसोटी लागली. एकीकडे जागतिक जनमत तर दुसरीकडे प्रत्येक प्रसंगी साथ देणारा परंपरागत मित्र देश रशिया. यापैकी कोणास समर्थन द्यायचे ही समस्या. रशिया हा व्यापारी भागीदार आहे आणि युरेशियन प्रदेशात त्याचा फायदा आहे. थेट रशिया च्या विरोधात भारत जाऊ शकत नाही. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी ही समस्या मोठ्या कसोटीने हाताळली. संयुक्त राष्ट्र संघटनेत मतदान प्रसंगी अनुपस्थित राहून जागतिक जनमताचा व भारताच्या अनाक्रमण या मूल सिद्धांताचा सुद्धा सन्मान केला आणि परंपरागत मित्र देश रशिया ला विरोध सुद्धा केला नाही. भारताच्या राष्ट्रीय कल्याणसाठी आदर्शवादापेक्षा वास्तववादास महत्व देऊन राष्ट्रीय हितास महत्व दिले.

**इस्रायल – पॅलेस्टाईन संघर्ष –**

भारताच्या परराष्ट्र धोरणावर परिणाम करणारे आणखी एक प्रकरण म्हणजे इस्रायल – पॅलेस्टाईन संघर्ष होय. दोन्ही भारताचे मित्र देश म्हणून भारताचे संबंध पूर्वी पासून

दोघांसोबत आहेत. 7 ऑक्टोबर 2023 रोजी हमास या संघटनेने केलेल्या हल्ल्यानंतर या युद्धाची सुरुवात झाली. या युद्धमुळे भारतावर सुद्धा परिणाम झाला. तेलाच्या किमती वाढल्या सोबतच जीवनावश्यक वस्तूंच्या पुरवठ्यावर सुद्धाचा विपरीत परिणाम झाला. भारताने या युद्धात दोन्ही पक्षांना शांतता व चर्चेच्या माध्यमातून तोडगा काढण्याचे आव्हाहण केले.

## निष्कर्ष –

मुळात सुरुवाती पासूनच भारताचे इतर राष्ट्रासंदर्भातील धोरण हे आक्रमक न राहता संयमी, जबाबदारपूर्ण व विश्वासाचे राहिलेले आहे. दुसऱ्या राष्ट्रांची भूमी बळकवण्याचा प्रयत्न भारताने आजवरच्या इतिहासात कधीच केलेला नाही. भारत नेहमी बचावात्मक किंवा स्वसंरक्षनात्मक भूमिकेत राहिला आहे.

G 20 परिषदेचे यशस्वी आयोजन, क्वाड समूह, शेजारी राष्ट्रांसोबतचे मजबूत होणारे परराष्ट्र संबंध, पूर्वेकडील राष्ट्रासोबतचे Act East धोरण, पाकिस्तान च्या ताब्यातील काश्मीर प्रकरणात भारताची आग्रही भूमिका, दोन्ही महासत्ता सोबतच्या संबंधात सुधारणा, रशिया – युक्रेन युद्धात भारताची भूमिका इ. प्रसंगात भारताच्या परराष्ट्र धोरणात प्रासंगिक व वास्तववादी दृष्टीकोण समोर ठेवून बदल केल्याचे स्पष्टपणे दिसून येते.

## संदर्भग्रंथ सूची –

1. दिक्षित, जे., 2018, भारत की आंतरराष्ट्रीय विदेश नीति, नई दिल्ली, प्रभात प्रकाशन.
2. पंत, पु., 2018, भारत की विदेश नीति, नई दिल्ली, मॅक्रो हिल एड्युकेशन.
3. देवळनकर, शै., 2010, भारताचे परराष्ट्र धोरण सातत्य व स्थित्यंतरे, औरंगाबाद, कैलाश प्रकाशन.
4. देवळनकर, शै., 2005, भारत आणि जग, पुणे, सकाळ प्रकाशन.
5. अमृतकर, प्र., 2010, आंतरराष्ट्रीय संबंध, औरंगाबाद, कैलाश प्रकाशन.
6. रायपूरकर, व., 1999, आंतरराष्ट्रीय संबंध, नागपुर, विद्या प्रकाशन.
7. पाटील, व्ही., 2000, भारताचे परराष्ट्र धोरण, पुणे, के. सागर प्रकाशन.
8. पाटील, वा., 2015, भारताचे परराष्ट्र धोरण, जळगाव, प्रशांत पब्लिकेशन्स.